# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

## अधिसूचना

**क्र. परीक्षा/हिवाळी-2016/379** **दिनांक 30/04/2016**

## हिवाळी 2016 परीक्षेकरीता आवेदन पत्रे महाविद्यालयातून भरण्याची पद्धत

सर्व संबंधितांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, हिवाळी-2016 परीक्षेसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी सुधारीत नमुन्यातीलच आवेदन पत्रे सादर करावीत.

**1. नियमित महाविद्यालयीन माजी विद्यार्थी (म्हणजे जुने अनुत्तीर्ण विद्यार्थी व उन्हाळी – 2016 परीक्षेचे अनुत्तीर्ण विद्यार्थी) पूर्वी ज्या महाविद्यालयाचे नियमित विद्यार्थी होते, त्याच महाविद्यालया मधून परीक्षा आवेदन पत्रे सादर करतील.**

**सन 2015 – 16 च्या रब्बी हंगामातील पैसेवारी 50 पैशांपेक्षा कमी असलेल्या टंचाईग्रस्त गावातील यादी www.nagpuruniversity.org या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यांत आल्यानुसार त्या विद्यार्थ्याकडून प्रमाणपत्र घेऊन त्यांना शुल्क आकारू नये.**

2. या पूर्वी बी.ए. बहि:शाल व माजी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्रे निर्देश क्र. 2/2010 नुसार पर्यावरण अभ्यासक्रम अनिवार्य असल्यामुळे सदर परीक्षेचे आवेदन पत्रे सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे परीक्षा आवेदन पत्रे ज्या महाविद्यालयात हा अभ्यासक्रम शिकविला जातो तेथुन सादर करावे व त्याच महाविद्यालयात पर्यावरण अभ्यासक्रमाकरिता Casual प्रवेश घेऊन हा अभ्यासक्रम पूर्ण करावा. तसेच या विषयाची ग्रेड पाठविण्याबाबत महाविद्यालयांना कळवावे.

3. बी.ए. व बी.ए. (अतिरिक्त) बहि:शाल अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक परीक्षेचे विषय घ्यावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी ज्या संबंधीत महाविद्यालयात ते विषय शिकवीण्यात येतात तेथेच Casual प्रवेश घेऊन त्याच महाविद्यालयातील बहि:शाल विद्यार्थी म्हणुन त्याच महाविद्यालयातून परीक्षा आवेदन पत्र सादर करावे.

4. एम.ए., भाग-2, एम.कॉम भाग-2 अनुत्तीर्ण व बहिशाल विद्यार्थ्याचे परीक्षेचे परीक्षा आवेदन पत्रे ज्या महाविद्यालयात सदर अभ्यासक्रम शिकविला जातो अशा महाविद्यालयाकडून स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | आवेदन स्विकारण्याचे स्थळ | परीक्षेचे नांव |
|---|---|---|
| 1. | **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**<br>**परिक्षा भवन,**<br>**लक्ष्मीनारायम तांत्रिक संस्था परिसर,**<br>**भरत नगर, अमरावती रोड, नागपूर-४४००३३.** | बी.ए. (अतिरिक्त) व बी.ए.<br>भाग – 1, 2 व अंत्य<br>एम.ए. भाग अंत्य.<br>एम.कॉम. भाग – 2<br>एम.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय व अंतीम परिक्षेला बसणारे बहिशाल विद्यार्थी<br>(प्रात्यक्षिक परिक्षा विषय सोडून) |

**आवेदन पत्रे स्विकारण्याच्या अंतिम तिथी खालीलप्रमाणे राहतील :-**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची वर्गवारी | अंतिम तारीख | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | वार्षिक परिक्षेशी संबंधित सर्व बहि:शाल (External) व जूने माजी विद्यार्थी (Ex-students i.e. old Failures) | 15 मे 2016 (विना विलंब शुल्क) | 15 जून 2016 (रू 50/- विलंब शुल्कासह) | 30 जून 2016 (रू 100/- विलंब शुल्कासह) | 31 जुलै 2016 (रू 100+ रू 10/- प्रति दिवसाला विलंब शुल्कासह) | 31 ऑगस्ट 2016 (रू 1500+ रू 50/- प्रति दिवसाला विलंब शुल्कासह) |
| 2. | नियमित विद्यार्थी (सेमिस्टर पटर्न) अर्धवार्षिक परीक्षा | 31 ऑगस्ट 2016 (विना विलंब शुल्क) | 1 सप्टेंबर 2016 ते 15 सप्टेंबर 2016 (रू. 50/- विलंब शुल्क) | 16 सप्टेंबर 2016 ते 30 सप्टेंबर 2016 (रू. 1500/- + 50/- 1 आक्टोंबर 2016 ते 15 आक्टोंबर 2016 2250/- + 50/- प्रति दिवस विलंब शुल्क | 16 आक्टोंबर 2016 ते 31 आक्टोंबर 2016 (रू. 5000/- + 50/- 1 नोव्हेंबर 2016 ते 15 नोव्हेंबर 5750/- + 1500 + 50/- प्रति दिवस विलंब शुल्क | 16 नोव्हेंबर 2016 ते 30 नोव्हेंबर विलंब शुल्क (रू. 7000/- + 50/- प्रति दिवस मुदत संपल्यावर (रू. 5000/- + 50/- प्रति दिवस किंवा जो दिवस लवकर येईल त्या दिवसा पर्यंत 15 डिसेंबर विलंब शुल्क (रू. 10000/- + 50/- प्रति दिवस मुदत संपल्यावर विलंब शुल्क व (रू. 7000/- + 50/- प्रति दिवस किंवा जो दिवस लवकर येईल त्या दिवसा पर्यंत. |
| 3. | उन्हाळी 2016 परीक्षेचे अनुत्तीर्ण विद्यार्थी (Failures of Last Preceding Summer 2014 Examination) | निकाल घोषित झालेल्या तारखे पासून 15 दिवसांचे आंत (विना विलंब शुल्क) | विना विलंब शुल्क अंतिम तारीख संपल्यानंतर पुढील 15 दिवसांचे आंत (रू 50/- विलंब शुल्का सह) | विलंब शुल्क रू 50/- ची अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत किंवा संबंधित परीक्षा सुरू होण्या पूर्वी 15 दिवसा आगोदर, यापैकी जो दिवस लवकर येईल, त्या दिवसा पर्यंत(रू 1500/- + रू. 50/- प्रति दिवस विलंब शुल्का सह) | विलंब शुल्क रू 1500/- + रू. 50/-ची अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत किंवा संबंधित परीक्षा सुरू होण्या पूर्वी 15 दिवसा आगोदर, यापैकी जो दिवस लवकर येईल, त्या दिवसापर्यंत (रू. 5000/- + रू. 50/- प्रति दिवस विलंब शुल्का सह) | विलंब शुल्क रू 5000/-+ रू. 50/- ची अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत किंवा संबंधीत परीक्षा सुरू होण्या पूर्वी 15 दिवसा आगोदर यापैकी जो दिवस लवकर येईल, त्या दिवसा पर्यंत(रू 7000/- + रू. 50/- प्रति दिवस विलंब शुल्का सह) |

4. बहिशाल विद्यार्थी उन्हाळी 2016 च्या सेमिस्टर पॅटर्न मधिल वाङ:मय पारंगत परिक्षेतील प्रथम, द्वितीय व तृतीय सेमिस्टरचे उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी निकाल घोषीत झाल्यावर 15 दिवसांचे आत परीक्षा आवेदनपत्रे ज्या महाविद्यालयात जो विषय शिकविण्यात येतो त्याच विषयाचे आवेदनपत्रे Online (विद्यापिठाचे पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभाग वगळून) स्विकारण्यात येतील.

**जुन्या नमुन्यातील परीक्षा आवेदन पत्रे स्विकारल्यास किंवा वर नमूद केलेली अंतिम तारीख संपल्यानंतर आवेदन पत्रे स्विकारल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयाची/विद्यापीठ शैक्षणिक विभागाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागांना विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदन पत्रे भरून घेण्याविषयी ज्या आवश्यक सूचना पाठविण्यात आलेल्या आहेत, त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करूनच आवेदन पत्रे स्विकारावीत.

**मा. कुलगुरूंचे आदेशान्वये,**
**परीक्षा नियंत्रक**